"A++" *Accredited by* NAAC (2021) With CGPA-3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

## परिपत्रक

**जा.क्र. सी.डी.ओ.ई.\298** **दिनांक:-14/05/2026**

**विषय:** 'Pursuing Two Academic Programmes Simultaneously (Dual Degree- दुहेरी पदवी)' अंतर्गत प्रवेशाबाबत सूचना.

**संदर्भ :** १. पात्रता विभागाचे दि. १६/०६/२०२५ रोजीचे परिपत्रक व आदेश.
२. पात्रता विभागाचे दि. २८/०७/२०२२ रोजीचे परिपत्रक व दि. २९/०७/२०२२ रोजीचे आदेश.
३. विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) यांचे दि. १३ एप्रिल २०२२ रोजीचे मार्गदर्शक पत्र व सूचना.

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रांतर्गत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी (Distance व Online Programme) शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने सुरू करण्यात आलेली आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या "Pursuing Two Academic Programmes Simultaneously" या मार्गदर्शक सूचनांनुसार विद्यार्थ्यांना एकाच वेळी दोन शैक्षणिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेण्याची मुभा देण्यात आलेली आहे. त्यानुसार दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फतही विद्यार्थ्यांना 'दुहेरी पदवी' (Dual Degree) अंतर्गत प्रवेशाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.त्यानुसार संबंधित अभ्यासकेंद्रांनी सूचनांचे पालन करावे.

Sd/-
**उपकुलसचिव**
**दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

प्रति :

मा. अभ्यासकेंद्र प्रमुख / समन्वयक
सर्व दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राची अभ्यासकेंद्रे कोल्हापूर, सांगली व सातारा

प्रत : -

१. मा. प्र. संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
२. सहाय्यक कुलसचिव, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
३. समन्वयक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
४. सर्व संबंधित विषय समन्वयक
५. सर्व संबंधित प्रशासकीय सेवक

"A++" *Accredited by* NAAC (2021) With CGPA-3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

**'Pursuing Two Academic Programmes Simultaneously (Dual Degree- दुहेरी पदवी)'**

**अंतर्गत प्रवेशाबाबत सूचना.**

१. दुहेरी पदवी अंतर्गत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या खालील संकेतस्थळावरून ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावा :

प्रवेश संकेतस्थळ : https://sukapps.unishivaji.ac.in/dualdegrec application/#/login

२. दुहेरी पदवी अंतर्गत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी विहित शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरावे. सदर शुल्काशिवाय परीक्षा शुल्क स्वतंत्र भरावे लागेल.

३. विद्यार्थ्यांनी दुहेरी पदवीचा प्रवेश अर्ज, शुल्क पावती व संबंधित अभ्यासक्रमांची आवश्यक कागदपत्रे संबंधित अभ्यासकेंद्रात विहित मुदतीत जमा करावीत.

४. विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरताना स्वतःचा कार्यरत मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी नमूद करणे आवश्यक आहे.

५. दुहेरी पदवी अंतर्गत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी शासन, विद्यापीठ व विद्यापीठ अनुदान आयोग (UGC-DEB) यांच्या नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

६. विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज अंतिम सबमिट करण्यापूर्वी सर्व माहिती काळजीपूर्वक तपासावी. अंतिम सबमिट झाल्यानंतर माहितीमध्ये बदल करण्यास मर्यादा राहतील.

७. विद्यार्थ्यांनी Login ID व Password गोपनीय ठेवावेत. त्याद्वारे झालेल्या सर्व व्यवहारांची जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची राहील.

८. दुहेरी पदवी अंतर्गत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी दोन्ही अभ्यासक्रमांचे वेळापत्रक, परीक्षा, Assignment, अंतर्गत मूल्यमापन व इतर शैक्षणिक जबाबदाऱ्या स्वतः पार पाडाव्यात.

९. विद्यार्थ्यांनी ABC ID तयार करून प्रवेश अर्जात नमूद करणे आवश्यक आहे.

१०. प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील सर्व सूचना वेळोवेळी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येतील. विद्यार्थ्यांनी नियमितपणे संकेतस्थळ तपासावे.

११. आवश्यक असल्यास संबंधित अभ्यासकेंद्रांनी विद्यार्थ्यांना दुहेरी पदवी संदर्भातील मार्गदर्शन करावे.

१२. प्रवेश प्रक्रियेदरम्यान चुकीची अथवा खोटी माहिती सादर केल्यास संबंधित विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द करण्याचा अधिकार विद्यापीठास राहील.

१३. प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील सर्व अंतिम अधिकार दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडे राहतील.

वरील सूचनांची संबंधित विद्यार्थ्यांना माहिती देऊन आवश्यक कार्यवाही करावी.

Sd/-

**उपकुलसचिव,**
**दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**